भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषिद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९८८

**(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४६)**

[दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान]

# The Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1988

**(Act No. 46 of 1988)**

**[ As in force on the 1st December, 1999]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ५.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दी प्रिव्हेंशन ऑफ इलिसीट ट्रॅफिक इन नारकोटिक्स ड्रग्ज अँन्ड सायकोट्रोपिक सबस्टन्स अॅक्ट, १९८८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ २५ ते ३० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रितीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the The Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substance Act, 1988 as on the 1st December, 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part-XII, Section-1, No. 1, Volume 11, dated 22nd June 2000 on pages 25 to 30.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

Dr. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

# अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ विधिनिषिद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९८८

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठी आदेश देण्याची शक्ती.

४. स्थानबद्धतेच्या आदेशांची अंमलबजावणी.

५. स्थानबद्धतेच्या जागेचे व शर्तींचे विनियमन करण्याची शक्ती.

६. स्थानबद्धतेची कारणे वेगवेगळी असणे.

७. विवक्षित कारणांवरून स्थानबद्धतेचे आदेश विधिबाह्य किंवा अप्रवर्ती नसणे.

८. फरारी व्यक्तींच्या संबंधातील शक्ती.

९. सल्लागार मंडळे.

१०. सल्लागार मंडळाचे मत घेतल्याशिवाय ज्या प्रकरणांमध्ये व ज्या परिस्थितीमध्ये व्यक्तींना तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीकरिता स्थानबद्ध करता येईल, ती प्रकरणे व ती परिस्थिती.

११. स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.

१२. स्थानबद्धतेचा आदेश मागे घेणे.

१३. स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची तात्पुरती मुक्तता.

१४. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

१५. १९७४ चा अधिनियम ५२ याचे विशोधन.

१६. निरसन व व्यावृत्ति.


(शा.म.मु.) एच ४००२—२ (१०३५—१–२००४)

# अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ विधिनिषिद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९८८

**(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४६)**

(१ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[६ सप्टेंबर, १९८८]

**अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापारास प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनार्थ, विवक्षित प्रकरणी स्थानबद्धतेसाठी आणि त्याच्याशी संबंधित गोष्टींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापारामुळे जनतेचे आरोग्य व कल्याण यांना गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे आणि अशा विधिनिषिद्ध व्यापारात गुंतलेल्या व्यक्तींच्या कृत्यांमुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर हानिकारक परिणाम झालेला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशी कृत्ये ज्यांच्याकडून व ज्या रीतीने केली जातात व पार पाडली जातात त्या व्यक्ती व ती रीत विचारात घेता, आणि अशी अतिशय मोठ्या प्रमाणात केली जाणारी व पार पाडली जाणारी अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापाराची चोरटी कृत्ये ज्या विवक्षित क्षेत्रात चालतात ती विवक्षित क्षेत्रे विचारात घेता, अशा कृत्यांना परिणामकरीत्या प्रतिबंध करण्यासाठी त्या कृत्यांशी संबंधित व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठी उपबंध करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणचाळिसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो.

१. (१) या अधिनियमास अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ विधिनिषिद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९८८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) याचा विस्तार जम्मू आणि काश्मीर ही राज्ये वगळता, संपूर्ण भारतभर आहे.

(३) ४ जुलै, १९८८ रोजी तो अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "समुचित शासन" याचा अर्थ, केंद्र सरकारने किंवा केंद्र सरकारच्या एखाद्या अधिकाऱ्याने काढलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशाच्या बाबतीत किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध केलेल्या एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत केंद्र सरकार आणि राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याने काढलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशाच्या बाबतीत किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध केलेल्या एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत राज्य शासन, असा आहे ;

(ख) "सीमाशुल्क विमानतळ" याचा अर्थ, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या कलम ७, खंड (क) अन्वये नेमलेला कोणताही विमानतळ, असा आहे ;

(ग) "स्थानबद्धतेचा आदेश" याचा अर्थ, कलम ३ अन्वये काढलेला एखादा आदेश, असा आहे ;

(घ) "विदेशी व्यक्ती" याचा अर्थ, त्या संज्ञेला विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१) यामध्ये जो अर्थ असेल, तोच असेल ;

(ङ) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील "विधिनिषिद्ध व्यापार" याचा अर्थ, अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ अन्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा काढलेल्या आदेशान्वये किंवा त्याखाली दिलेल्या कोणत्याही लायसनाची शर्त किंवा दिलेल्या प्राधिकारपत्राची अट या अन्वये अनुज्ञात असतील ती कामे वगळून पुढील कामे—

(एक) कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करणे किंवा कोका वनस्पतीचा कोणताही भाग गोळा करणे ;

(दोन) अफूच्या झाडाची किंवा कोणत्याही कॅनाबिस वनस्पतीची लागवड करणे ;

(तीन) कोणतीही अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांचे उत्पादन, त्यांची निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्यांची विक्री, खरेदी, परिवहन,—वखार साठवण, लपवणूक, उपयोग किंवा उपभोग घेणे, त्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, भारतात आयात, भारतातून निर्यात किंवा वहिनांतरण यांमध्ये गुंतलेले असणे; किंवा

(चार) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील उपखंड (एक) ते (तीन) मध्ये उपबंधित केलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कोणतीही अन्य देवघेवीची कामे करणे ;

(पाच) उपखंड (एक) ते (चार) मध्ये निर्देशिलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी कोणत्याही वास्तूचा उपयोग करणे किंवा ती भाड्याने देणे; आणि त्यामध्ये,—

(१) पूर्वोक्तापैकी कोणत्याही कामासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वित्त व्यवस्था करणे ;

(२) पूर्वोक्तापैकी कोणत्याही पूर्वोक्त कामांपैकी कोणतेही काम करण्यासाठी त्याच्या पुरस्सरणार्थ किंवा त्याला पाठिंबा म्हणून अपप्रेरणा देणे किंवा कट करणे ; आणि

(३) पूर्वोक्तापैकी कोणत्याही कामात गुंतलेल्या व्यक्तींना आसरा देणे

——या गोष्टींचा समावेश होतो.

(च्) "भारतीय सीमा शुल्क सागर खंड" याचा अर्थ, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याचे कलम २, खंड २८ मध्ये दिल्याप्रमाणेच आहे ;

(छ्) "राज्य शासन" याचा, संघराज्य क्षेत्राच्या संबंधातील अर्थ त्याचा प्रशासक, असा आहे ;

(ज्) यात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या करण्यात न आलेले आणि अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) यात व्याख्या करण्यात आलेले शब्द आणि वाक्प्रयोग यांना त्या अधिनियमात अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

**विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठी आदेश देण्याची शक्ती.**

३. (१) केंद्र सरकार किंवा एखादे राज्य शासन किंवा केंद्र सरकारच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला व त्या सरकारने या कलमाच्या प्रयोजनार्थ, विशेषरीत्या शक्ती प्रदान केलेला, किंवा राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्या शासनाने या कलमाच्या प्रयोजनार्थ विशेषरीत्या शक्ती प्रदान केलेला कोणताही अधिकारी, कोणत्याही व्यक्तीला अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या व्यापारात गुंतण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, तसे करणे आवश्यक आहे याबाबत त्यांची खात्री झाल्यास, ते शासन किंवा त्या शासनाचा अधिकारी, अशा (विदेशी व्यक्तीचा समावेश करून) स्थानबद्ध करण्याबद्दल निदेश देणारा आदेश देऊ शकेल.

(२) एखाद्या राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाने शक्ती प्रदान केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून स्थानबद्धता आदेश काढला जाईल तेव्हा राज्य शासन, दहा दिवसांच्या आत या आदेशाच्या बाबतीतील अहवाल केंद्र सरकारकडे पाठवील.

(३) संविधानाच्या अनुच्छेद २२ च्या खंड (५) च्या प्रयोजनार्थ, ज्या कारणांवरून स्थानबद्धतेचा आदेश देण्यात आला असेल त्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीला स्थानबद्धतेनंतर लगेचच, परंतु सर्वसाधारणपणे स्थानबद्धतेच्या दिनांकापासून पाच दिवसांपेक्षा उशिरा नाही अशा कालावधीत, आणि अपवादात्मक परिस्थितीत तसेच, कारणे लेखी नमूद करून, त्या कारणास्तव कळवण्यात येईल.

**स्थानबद्धतेच्या आदेशांची अंमलबजावणी.**

४. भारतातील कोणत्याही जागी स्थानबद्धतेच्या आदेशाची अंमलबजावणी ही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये अटक वॉरंटाच्या अंमलबजावणीसाठी उपबंधित केलेल्या रितीने करण्यात येईल ;

**स्थानबद्धतेच्या जागेचे व शर्तींचे विनियमन करण्याची शक्ती.**

५. जिच्या बाबतीत स्थानबद्धतेचा आदेश देण्यात आलेला आहे अशी प्रत्येक व्यक्ती :—

(क्) समुचित शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी आणि निर्वाह खर्च, इतरांची भेट घेऊ देणे किंवा इतरांशी संवाद साधणे, शिस्त आणि शिस्तभंगासाठी शिक्षा होणे या शर्तीसकट, अशा शर्तींअन्वये स्थानबद्ध केली जाण्यास,

(ख्) समुचित शासनाच्या आदेशाद्वारे स्थानबद्धतेच्या एका ठिकाणापासून स्थानबद्धतेच्या दुसऱ्या ठिकाणी मग ते ठिकाण त्याच राज्यातील असो किंवा दुसऱ्या राज्यातील असो, हलवली जाण्यास,

——पात्र असेल :

परंतु, राज्य शासनाकडून खंड (ख्) अन्वये एखाद्या व्यक्तीला एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, त्या दुसऱ्या राज्य शासनाच्या संमतीशिवाय हलविण्याचा आदेश दिला जाणार नाही.

**स्थानबद्धतेची कारणे वेगवेगळी असणे.**

६. कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये स्थानबद्धतेच्या आदेशाला अनुसरून एखाद्या व्यक्तीला दोन किंवा अधिक कारणांवरून जर स्थानबद्ध करण्यात आले असेल तर अशा प्रत्येक कारणांसाठी असा स्थानबद्धतेचा आदेश वेगवेगळा दिला असल्याचे मानण्यात येईल, आणि त्यानुसार,—

(क्) असा आदेश पुढील एका किंवा अनेक कारणांसाठी विधिबाह्य किंवा अप्रवर्तक असल्याचे मानण्यात येणार नाही—

(एक) संदिग्ध ;
(दोन) अस्तित्वहीन ;
(तीन) संबद्ध ;
(चार) अशा व्यक्तीशी संबंधित नसल्यामुळे किंवा निकट संबंधित नसल्यामुळे ; किंवा
(पाच) अन्य कोणत्याही कारणास्तव विधिबाह्य ठरल्यामुळे,

—आणि म्हणून असा आदेश देणाऱ्या शासनाने किंवा अधिकाऱ्याने कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अवशिष्ट कारणाच्या संदर्भात खात्री पटल्याचे आणि त्यावरून स्थानबद्धतेचा आदेश दिल्याचे समजता येणार नाही ;

(ख्) उक्त पोटकलम (१) अन्वये, शासनाने किंवा अधिकाऱ्याने दिलेला स्थानबद्धतेचा आदेश त्या पोट कलमामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अवशिष्ट कारण किंवा कारणे यांच्या संदर्भात खात्री पटल्यानंतर दिला असल्याचे मानण्यात येईल.

७. एखादा स्थानबद्धतेचा आदेश पुढील कारणांवरून विधिबाह्य किंवा अप्रवर्ती होणार नाही— विवक्षित कारणांवरून स्थानबद्धतेचे आदेश विधिबाह्य किंवा अप्रवर्ती नसणे.

(क्) त्या आदेशान्वये स्थानबद्ध होणारी व्यक्ती स्थानबद्धतेचा आदेश देणाऱ्या शासनाच्या किंवा अधिकाऱ्याच्या क्षेत्रीय अधिकारितेच्या सीमेबाहेर असेल तर, किंवा

(ख्) अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेची जागा सीमेच्या बाहेर असेल तर.

८. (१) जर समुचित शासनास असे मानण्यास संयुक्तिक कारण असेल की, जिच्या बाबतीत स्थानबद्धतेचा आदेश दिला असेल ती व्यक्ती फरारी आहे किंवा तिने स्वतःला असे लपविले आहे की, जेणेकरून आदेशाची अंमलबजावणी होऊ शकणार नाही, त्याबाबतीत ते शासन,— फरारी व्यक्तींच्या संबंधातील शक्ती.

(क्) महानगर दंडाधिकाऱ्यास किंवा उक्त व्यक्ती ज्या जागेत सामान्यपणे राहत असेल त्या जागेवर अधिकारिता असणाऱ्या, प्रथमवर्ग दंडाधिकाऱ्यास या वस्तुस्थितीबाबत लिखित अहवाल देऊ शकेल ; आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) हिची कलमे ८२, ८३, ८४ व ८५ यांचे उपबंध, उक्त व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात यावे असे निर्देशित करणारा आदेश म्हणजे दंडाधिकाऱ्याने काढलेले वॉरंट असावे असे समजून, उक्त व्यक्ती व तिची संपत्ती यांच्या-संबंधात लागू होतील,

(ख्) शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे, उक्त व्यक्ती त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यासमोर अशा जागी आणि अशा कालावधीत उपस्थित होण्याचा निदेश देऊ शकेल, आणि उक्त व्यक्ती अशा निदेशाचे अनुपालन करण्यास चुकेल तर, उक्त व्यक्तीने, त्या निर्देशाचे अनुपालन करणे तिला शक्य नव्हते आणि आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, तिने अनुपालन करणे शक्य नसल्याचे कारण व आपला ठावठिकाणा याबाबत त्या आदेशात उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यास कळवले होते हे सिद्ध केले नसेल तर, ती व्यक्ती एका वर्षापर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्य दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) च्या खंड (ख्) खालील प्रत्येक अपराध दखलपात्र असेल.

९. संविधानाच्या अनुच्छेद २२ च्या खंड (४) उपखंड (क्) आणि खंड (७) उपखंड (ग्) यांच्या प्रयोजनार्थ,— सल्लागार मंडळे.

(क्) केंद्र सरकार आणि प्रत्येक राज्य शासन, आवश्यक असेल त्या बाबतीत एक किंवा अधिक सल्लागार मंडळे घटित करील, त्यापकी प्रत्येक मंडळ संविधानाच्या अनुच्छेद २२ च्या खंड (४) च्या उपखंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता, धारण करणारे अध्यक्ष आणि अन्य दोन व्यक्तींचे मिळून बनलेले असेल;

(ख्) कलम १० मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून समुचित शासन, स्थानबद्धतेच्या आदेशान्वये एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच आठवड्यांच्या आत, खंड (क्) अन्वये घटित केलेल्या सल्लागार मंडळाला संविधानाचा अनुच्छेद २२ याच्या खंड (४) च्या उपखंड (क्) अन्वये अहवाल देण्यास समर्थ करण्यासाठी, त्याबाबतीत त्या मंडळा-कडे निर्देश करील;

(ग्) खंड (ख्) अन्वये ज्याच्याकडे निर्देश करण्यात आला असेल ते सल्लागार मंडळ निर्देशाचा आणि त्याच्यासमोर ठेवण्यात येणाऱ्या गोष्टींचा विचार करून आणि समुचित शासना-कडून किंवा यासाठी समुचित शासनामार्फत फर्मावण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती मागवल्यानंतर आणि कोणत्याही विशिष्ट बाबतीत, तसे करणे आवश्यक आहे असे त्याला वाटल्यास किंवा संबंधित व्यक्ती आपले म्हणणे जातीने मांडण्यास उत्सुक असल्यास, तिचे म्हणणे जातीने ऐकल्यानंतर आपला अहवाल तयार करील व त्यात स्वतंत्र परिच्छेद करून, त्यात संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेला पुरेसे कारण आहे किंवा नाही याविषयीचे आपले मत विनिर्दिष्ट करील आणि तो अहवाल संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून अकरा आठवड्यांच्या आत सादर करील;

(घ्) सल्लागार मंडळ ज्या सदस्यांचे मिळून बनले असेल त्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असल्यास अशा सदस्यांचे बहुमत हे मंडळाचे मत असल्याचे मानण्यात येईल;

(ङ्) या अधिनियमान्वये जिच्या विरुद्ध स्थानबद्धतेचा आदेश काढण्यात आला असेल ती व्यक्ती, सल्लागार मंडळाकडे केलेल्या संदर्भाशी संबंधित अशा कोणत्याही बाबतीत विधि व्यवसायी-मार्फत उपस्थित राहण्यास हक्कदार असणार नाही आणि सल्लागार मंडळाची कार्यवाही आणि त्याचा अहवाल, त्यातील ज्या भागात सल्लागार मंडळाचे मत विनिर्दिष्ट केलेले असेल, तो भाग वगळता, गोपनीय असेल;

(च्) सल्लागार मंडळाच्या मते एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेला पुरेसे कारण आहे असे त्याने कळवले असेल अशा प्रत्येक बाबतीत समुचित शासन, स्थानबद्धतेचा आदेश कायम करू शकेल आणि त्याला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता चालू ठेवील आणि प्रत्येक प्रकरणात असे प्रतिवेदन केले असेल की, सल्लागार मंडळाच्या मते, संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेला पुरेसे कारण नाही असे त्याने कळवले असेल अशा प्रत्येक बाबतीत समुचित शासन स्थानबद्धतेचा आदेश प्रत्याहृत करील आणि त्या व्यक्तीला तात्काळ सोडून देण्याची व्यवस्था करील.

सल्लागार मंडळाचे मत घेतल्या-शिवाय ज्या प्रकरणांमध्ये व ज्या परि-स्थितीमध्ये व्यक्तींना तीन महिन्यां-पेक्षा अधिक कालावधी-करिता स्थानबद्ध करता येईल ती प्रकरणे व ती परिस्थिती.

१०. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, [१][३१ जुलै, १९९९] पूर्वी कोणत्याही वेळी, या अधिनियमाखाली जिच्या बाबतीत स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, (विदेशी व्यक्ती धरून) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांचा व्यापार करण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने अशा व्यक्तीच्या बाबतीत स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल आणि केंद्र सरकारची किंवा केंद्र सरकारच्या अपर सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा, या कलमाच्या प्रयोजनासाठी विशेष-रीत्या शक्ती प्रदान केलेल्या त्या शासनाच्या अधिकाऱ्याची अशी खात्री पटली असेल की, अशी व्यक्ती अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांचा विधिनिषिद्ध व्यापार चालण्याच्या दृष्टीने सहजभेद्य असेल अशा कोणत्याही क्षेत्रात, क्षेत्राबाहेर, क्षेत्रामधून किंवा क्षेत्राच्या आत अशा व्यापारात गुंतली आहे किंवा गुंतण्याचा संभव आहे आणि अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेपासून पाच आठवड्यांच्या आत अशा अर्थाचे घोषणापत्र करील त्याबाबतीत, संविधानाच्या अनुच्छेद २२, खंड (४) उपखंड (क्) च्या उपबंधास अनुसरून सल्लागार मंडळाचे मत न घेता, तीन महिन्यांपेक्षा अधिक परंतु सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही एवढ्या मुदतीसाठी स्थानबद्ध करता येईल.

**स्पष्टीकरण १.**—या पोटकलमामध्ये "असा विधिनिषिद्ध व्यापार चालण्याच्या दृष्टीने सहजभेद्य असलेले क्षेत्र" याचा अर्थ,—

(एक) भारतीय सीमाशुल्क जलधि क्षेत्र ;

(दोन) सीमाशुल्क विमानतळ ;

(तीन) मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास महानगरे आणि वाराणसी शहर ;

(चार) आंध्रप्रदेश, गोवा, गुजरात, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, ओरिसा, तामिळनाडू, आणि पश्चिम बंगाल राज्यांच्या क्षेत्रात आणि दमण आणि दीव, आणि पांडेचरी या संघराज्याच्या क्षेत्रात येणारे शंभर किलोमीटर्स रुंदीचे अंतर्देशीय क्षेत्र ;

(पाच) (क्) गुजरात, पंजाब आणि राजस्थान राज्यातील भारत-पाकिस्तान सीमेपासूनचे ;

(ख्) बिहार, सिक्किम, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल राज्यातील भारत-नेपाळ सीमेपासूनचे ;

(ग्) अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मिझोरम आणि नागालॅन्ड राज्यातील भारत—ब्रम्हदेश सीमेपासूनचे ;

(घ्) आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल राज्याच्या भारत-बांगलादेश सीमेपासूनचे ;

(ङ्) अरुणाचल प्रदेश, आसाम, सिक्किम, पश्चिम बंगाल राज्याच्या भारत-भूतान सीमेपासूनचे ;
—शंभर किलोमीटर्स रुंदीचे अंतर्देशीय क्षेत्र ;

(सहा) केंद्र सरकार, एखाद्या क्षेत्राची, किंवा, यथास्थिति, सीमाशुल्क ठाण्यांची सहजभेद्यता विचारात घेऊन शासकीय अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील असे इतर क्षेत्र किंवा सीमाशुल्क ठाणे.

**स्पष्टीकरण २.**—स्पष्टीकरण १ च्या प्रयोजनार्थ, "सीमाशुल्क ठाणे" याचा अर्थ, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या कलम २ च्या खंड (१३) मधील अर्थासारखाच आहे.

(२) ज्याला पोटकलम (१) चे उपबंध लागू होतात अशा स्थानबद्धतेच्या आदेशाखाली स्थानबद्ध झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत पुढील फेरबदलांच्या अधीनतेने कलम ९ चा प्रभाव असेल :—

(एक) खंड (ख) मध्ये, "पाच आठवड्यांच्या आत" या शब्दांऐवजी "चार महिने आणि दोन महिन्यांच्या आत" हे शब्द दाखल करण्यात येतील.

---

१. १९९० चा अधिनियम २६ याच्या कलम २ द्वारे मूळ अधिनियमातील कलम १० मधील "३१ जुलै, १९९०" या मजकुराऐवजी "३१ जुलै, १९९३" हा मजकूर घातला होता तो १९९३ चा अधिनियम ५३ याच्या कलम २ द्वारे "३१ जुलै, १९९६" असा करण्यात आला. तो १९९६ चा अधिनियम १६ याच्या कलम २ द्वारे "३१ जुलै, १९९९" असा करण्यात आला आहे.

(दोन) खंड (ग्) मध्ये—

(क्) संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता या शब्दाऐवजी "संबंधित व्यक्तीची चालू राहिलेली स्थानबद्धता" हे शब्द दाखल करण्यात येतील.

(ख्) "अकरा आठवडे" या शब्दाऐवजी "पाच महिने आणि तीन आठवडे" हे शब्द दाखल करण्यात येतील.

(तीन) खंड (च्) मध्ये, "स्थानबद्धतेसाठी" हे शब्द ज्या दोन ठिकाणी आले आहेत तेथे त्याऐवजी "चालू राहिलेल्या स्थानबद्धतेसाठी" हे शब्द दाखल करण्यात येतील.

**स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.**

११. ज्या आदेशास कलम १० चे उपबंध लागू होत नाहीत आणि जो कलम ९ च्या खंड (च्) अन्वये कायम करण्यात आला आहे अशा स्थानबद्धतेस अनुसरून कोणत्याही व्यक्तीला ज्या कालावधीसाठी स्थानबद्ध करून ठेवण्यात आले असेल तो कमाल कालावधी आणि ज्या आदेशास कलम १० चे उपबंध लागू होतात आणि जो कलम ९ चा खंड (च्) आणि कलम १० चे पोटकलम (२) अन्वये कायम करण्यात आला आहे, अशा स्थानबद्धतेस अनुसरून कोणत्याही व्यक्तीला ज्या कालावधीसाठी स्थानबद्ध करून ठेवण्यात आले असेल तो कमाल कालावधी स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दोन वर्षांचा असेल :

परंतु, या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही आधीच्या वेळी एक तर स्थानबद्धता आदेश मागे घेण्याच्या किंवा त्या आदेशात फेरबदल करण्याच्या समुचित शासनाच्या शक्तीवर परिणाम होणार नाही.

**स्थानबद्धतेचा आदेश मागे घेणे.**

१२. (१) सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याच्या कलम २१ च्या उपबंधांना बाध न येता, स्थानबद्धतेचा आदेश —

(क्) तो एखाद्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्याने त्या राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने दिलेला असला तरी ;

(ख्) तो केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने दिलेला असला तरी;

कोणत्याही वेळी मागे घेता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

(२) एखादा स्थानबद्धता आदेश मागे घेण्यामुळे, त्याच व्यक्तीविरुद्ध दुसरा एखादा स्थानबद्धता आदेश काढण्यास आडकाठी येणार नाही.

**स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची तात्पुरती मुक्तता.**

१३. (१) केंद्र सरकार, कोणत्याही वेळी त्या शासनाने किंवा त्या शासनाच्या दुय्यम अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या दुय्यम अधिकाऱ्याने काढलेल्या स्थानबद्धता आदेशास अनुसरून स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, एकतर बिनशर्त किंवा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, त्या व्यक्तीला मान्य होतील त्या शर्तीवर कितीही कालावधीसाठी मुक्त करण्यात यावे असा निदेश देऊ शकेल आणि कोणत्याही वेळी तिची मुक्तता रद्द करू शकेल.

(२) राज्य शासन, कोणत्याही वेळी, त्या शासनाने किंवा त्या शासनाच्या दुय्यम अधिकाऱ्याने काढलेल्या एखाद्या स्थानबद्धता आदेशास अनुसरून स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीला एकतर बिनशर्त किंवा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, त्या व्यक्तीला मान्य होतील त्या शर्तीवर कितीही कालावधीसाठी मुक्त करण्यात यावे असा निदेश देऊ शकेल आणि कोणत्याही वेळी तिची मुक्तता रद्द करू शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीच्या मुक्ततेचा निदेश देताना निदेश देणारे शासन, निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे रीतसर अनुपालन करण्यासाठी बंधपत्राबरोबर जामीनखत करून देण्याबाबत त्या व्यक्तीला फर्मावू शकेल.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली मुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, त्याच्या मुक्ततेबाबत निदेश देणाऱ्या किंवा यथास्थिति मुक्तता रद्द करणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी प्राधिकरणाकडे स्वतःला अभ्यर्पित करील.

(५) कोणतीही व्यक्ती पोटकलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रितीने, पुरेशा कारणाअभावी स्वतःला अभ्यर्पित करण्यास चुकेल त्याबाबतीत दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(६) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली मुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती उक्त पोटकलम अन्वये तिच्यावर लादलेल्या किंवा तिने करून दिलेल्या बंधपत्रातील कोणत्याही शर्तीची पूर्तता करण्यास चुकेल, त्याबाबतीत ते बंधपत्र समपहृत झाले असल्याने घोषित करण्यात येईल आणि बंधपत्राद्वारे बद्ध असलेली कोणतीही व्यक्ती त्याबद्दल शास्ती भरण्यास दायी असेल.

(७) कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि या कलमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून एरव्ही अंमलात असलेल्या व्यक्ती, जिच्याविरुद्ध या अधिनियमान्वये काढण्यात आलेला स्थानबद्धतेचा आदेश अंमलात असेल अशा कोणत्याही व्यक्तीची जामीनपत्रावर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मुक्तता होणार नाही.

सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण. १४. या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र सरकारविरुद्ध किंवा राज्य शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य विधिविषयक कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दावा, खटला किंवा विधिविषयक कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

१९७४ चा अधिनियम ५२ याचे विशोधन १५. परकीय चलन जतन करणे आणि तस्करी कृत्यांना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४ याच्या कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :

परंतु, या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणावरून अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८८ याच्या कलम ३ अन्वये किंवा जम्मू आणि काश्मीर अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापारास प्रतिबंध करण्याबाबत अध्यादेश, १९८८ (१९८८ चा जम्मू आणि काश्मीर अध्यादेश) याच्या कलम ६ अन्वये कोणताही स्थानबद्धता आदेश काढण्यात येणार नाही.

[1][निरसन व व्यावृत्ति. १६. (१) अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या विधिनिषिद्ध व्यापारास प्रतिबंध करण्याबाबत (विशोधन) अध्यादेश, १९९३ (१९९३ चा अध्यादेश २७) हा याद्वारे निरसित होत आहे.

(२) अध्यादेश अशा रितीने निरसित झाला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे विशोधित झाल्याप्रमाणे मूळ अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही या अधिनियमाद्वारे विशोधित केलेल्या मूळ अधिनियमाअन्वये केली असल्याचे किंवा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९९० चा अधिनियम २६ याच्या कलम ३ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम १६ चे विशोधन केले होते ते १९९३ चा अधिनियम २७ द्वारे आणखी विशोधित केले.